लोकमत




सत्कारमूर्ती डॉ. नंदकुमार कामत, डॉ. के. डी. साधले यांच्यासमवेत मंत्री रोहन खंवटे, राजेंद्र केरकर, डॉ. प्रदीप सरमोकादम आदी.

# पर्यावरण संवर्धन सामूहिक जबाबदारी

## रोहन खंवटे। एकदिवसीय जैवविविधता संमेलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पर्वरी :** पर्यावरणाचा समतोल राखणे आपल्या हातात आहे. पर्यावरणाद्वारे गोव्याचे अस्तित्व राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यावर विविध स्तरांतून चर्चात्मक कार्यक्रम घडवून आणावयास हवेत. राज्यात अनेक समस्या आहेत आणि केवळ सरकार एकटे या समस्यांचे निवारण करु शकणार नाही. त्यासाठी नागरिकांचेही सहकार्य हवे, असे आवाहन महसूल मंत्री रोहन खंवटे यांनी केले.

साल्वादोर द मुंद येथील पंचायत सभागृहात शनिवारी (दि. ८) गोवा राज्य जैवविविधता मंडळाने आयोजित केलेल्या एकदिवसीय जैवविविधता संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या वेळी पर्यावरनप्रेमी राजेंद्र केरकर, डॉ. नंदकुमार कामत, डॉ. के. डी. साधले, मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमोकादम उपस्थित होते.

गोव्यातील पहिले 'हर्बल उद्यान' पेन्ह द फ्रान्स पंचायतीच्या सहकार्याने केल्याचे समाधान आम्हाला मिळाले, असे खंवटे यांनी नमूद केले. आंतरराष्ट्रीय पर्यावरणदिनाचे औचित्य साधून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी डॉ. नंदकुमार कामत आणि डॉ. के. डी. साधले यांचा मंत्री खंवटे यांच्या हस्ते शाल, मानचिन्ह आणि रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. तसेच उत्तर गोवा आणि दक्षिण गोव्यातील जैवविविधता मंडळांचा मंत्र्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या निमित्ताने मंडळातर्फे विविध फळझाडे, फुलझाडांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. आल्मेदा हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत गायिले. डॉ. सरमोकदम यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुभाष जाण यांनी केले. या वेळी मोठ्या संख्येने शेतकरी बंधू उपस्थित होते.

पुढारी





पर्वरी : साल्वादोर द मुंद येथे जैव विविधता संमेलनात मंत्री रोहन खंवटे. सोबत सत्कारमूर्ती. (छाया : दत्ता शिरोडकर)

# पर्यावरणाचा समतोल राखणे प्रत्येकाच्या हातात

## मंत्री रोहन खंवटे : एकदिवसीय जैव विविधता संमेलनाचे आयोजन

**पर्वरी : वार्ताहर**

पर्यावरणाचा समतोल राखणे प्रत्येकाच्या हातात आहे. पर्यावरणाद्वारे गोव्याचे अस्तित्व राखणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यावर विविध स्तरातून चर्चात्मक कार्यक्रम घडवून आणावयास हवेत. राज्यात अनेक समस्या आहेत आणि केवळ सरकार एकटे या समस्यांचे निवारण करू शकणार नाही, त्यासाठी नागरिकांचेही सहकार्य हवे, असे प्रतिपादन महसूल, आणि तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे यांनी केले. शनिवार दि.८ रोजी साल्वादोर मुंद येथील पंचायत सभागृहात गोवा राज्य बायोडायव्हर्सिटी मंडळाने आयोजित केलेल्या एक दिवसीय जैव विविधता संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

पर्यावरणप्रेमी राजेंद्र केरकर, डॉ. नंदकुमार कामत, डॉ. के. डी. साधले. मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमोकादम उपस्थित होते.

खंवटे म्हणाले, की पर्वरी मतदारसंघातील तिन्ही पंचायतींमार्फत सर्वप्रथम घरोघरी कचरा उचलण्याचे काम सुरु केले. मतदारसंघातील पर्यावरण आणि वातावरण स्वच्छ राखण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनीही यासाठी आम्हाला सहकार्य करावे. कचरा विघटित (ओला व सुका)करून द्यावा. गोव्यातील पहिले हर्बल उद्यान पेन्ह द फ्रान्स पंचायतीच्या सहकार्याने केल्याचे समाधान आम्हाला मि ळाले. आंतरराष्ट्रीय पर्यावरणदिनाचे औचित्य साधून सदर संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. नंदकुमार कामत, डॉ के. डी. साधले यांचा मंत्री खंवटे यांच्या हस्ते शाल, मानचिन्ह आणि रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. उत्तर गोवा आणि दक्षिण गोव्यातील बायोडायव्हर्सिटी मंडळांचा मंत्र्याच्या हस्ते गौरव करण्यात आला. या निमीत्ताने मंडळातर्फे विविध फळझाडे, फुलझाडांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

आल्मेदा हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायिले. डॉ. सरमोकदम यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुभाष जाण यांनी केले. यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारच्या सत्रात जैव विविधतेवर आधारित सिनेमा दाखविण्यात आला. तसेच विविध चर्चा सत्रे घडवून आणण्यात आली. त्यात अनेक अनुभवी तज्ज्ञ व्यक्तींनी भाग घेतला होता.

Goa Edition
9 Jun, 2019 Page No. 5
Powered by : erelego.com

गोमन्तक



**पर्वरी : साल्वादोर द मुंद येथे जैव विविधता संमेलनात सत्कारमूर्तीसमवेत मंत्री रोहन खंवटे, राजेंद्र केरकर, कमलाकर साधले, डॉ. नंदकुमार कामत.** (दत्ता शिरोडकर)

# पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक

## मंत्री रोहन खंवटे : एकदिवसीय जैव विविधता संमेलन

पर्वरी ता. ८ (वार्ताहर) : पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे. पर्यावरणाद्वारे गोव्याचे अस्तित्व राखणे हीआपली सामुहिक जबाबदारी आहे केवळ सरकार एकटे या समस्यांचे निवारण करू शकणार नाही, त्यासाठी नागरिकांचेही सहकार्य हवे, असे प्रतिपादन महसूल, आणि तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे यांनी केले. आज साल्वादोर द मुंद येथील पंचायत सभागृहात गोवा राज्य बायोडायव्हर्सिटी मंडळाने आयोजित केलेल्या एक दिवसीय जैव विविधता संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पर्यावनप्रेमी राजेंद्र केरकर, डॉ नंदकुमार कामत, डॉ के. डी. साधले, मंडळाचे सदस्य सचिव डॉ प्रदीप सरमोकादम उपस्थित होते.

पर्वरी मतदारसंघातील तिन्ही पंचायतींमार्फत सर्वप्रथम घरोघरी कचरा उचलण्याचे काम सुरू केले. मतदारसंघातील पर्यावरण आणि वातावरण स्वच्छ राखण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनीही यासाठीआम्हाला सहकार्य करावे, कचरा विघटित (ओला व सुका) करून द्यावा, असे आवाहन खंवटे यांनी यावेळी केले.

यावेळी डॉ. नंदकुमार कामत आणि डॉ के. डी. साधले यांचा मंत्री खंवटे यांच्याहस्ते शाल, मानचिन्ह आणिरोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला तसेच उत्तर गोवा आणि दक्षिण गोव्यातील बायोडायव्हर्सिटी मंडळांचा मंत्र्याच्या हस्ते गौरव करण्यात आला.या निमीत्ताने मंडळातर्फे विविध फळझाडे, फुलझाडांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

राष्ट्रगीताने संमेलनाचा प्रारंभ झाला. आल्मेदा हायस्कुलच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायिले.डॉ सरमोकदम यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सुभाष जाण यांनी केले. यावेळी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येनें उपस्थित होते. दुपारच्या सत्रात जैव विविदतावर आधारित सिनेमा दाखविण्यात आले तसेच विविध चर्चा सत्रे घडवून आणण्यात आली. त्यात अनेक अनुभवी तज्ञ व्यक्तींनी भाग घेतला होता.

Goa, Main
09/06/2019 Page No. 11

# सहकार्याशिवाय समस्या सुटणे अशक्य

## मंत्री रोहन खंवटे : साल्वादोर द मुंद येथे जैविक विविधता दिन संपन्न

पर्वरी, दि. ८ (प्रतिनिधी) :

आज राज्य सरकारासमोर घन कचऱ्याचे व्यवस्थापन हे मोठे आव्हान आहे. जनतेच्या सहकार्याशिवाय ही समस्या सुटणे अशक्य आहे. गोव्यातील काही पंचायतींनी घरोघरी जाऊन घन कचरा गोळा करण्याचे काम सुरू केले आहे. पंचायतीनी रहिवाशांना ओला व सुका कचरा वेगळा करून पंचायतीकडे सुपूर्द करावा, असे आवाहन पंचायती सदैव करीत असतात. परंतु नागरिक ओला व सुका कचरा वेगळा न करताच पंचायतीला देतात. त्यामुळे तो कचरा वर्गीकृत करण्याची जबाबदारी पंचायतीवर येते. तसेच रहिवाशांनी आपण जेथे राहतो तो परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी स्वीकारली तर कचऱ्याची समस्या आपोआप सुटेल. म्हणून राज्यातल्या प्रत्येक रहिवाशांचे सहकार्य सरकारला अपेक्षीत आहे, असे महसूलमंत्री रोहन खंवटे यांनी सालय येथे सांगितले.

ते आंतरराष्ट्रीय जैविक विविधता या दिनानिमित्त साल्वादोर द मुंद पंचायतीच्या सभागृहात राज्य सरकार व गोवा राज्य जैविक विविधताय मंडळ यांनी भारत सरकारच्या राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर गोवा राज्य जैविक विविधताय मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमोकादम, गोवा राज्य रान खात्याचे मुख्य वनपाल सुभाष चंद्र, पर्यावरण तज्ज्ञ राजेंद्र केरकर व इतर मान्यवर उपस्थित होते.



साल्वादोर द मुंद : पुरस्कार प्राप्त मान्यवरांसोबत मंत्री रोहन खंवटे, राजेंद्र केरकर, डॉ. नंदकुमार कामत. (अनिल शंखवाळकर)

मंत्री रोहन खंवटे यांनी सांगितले की, सरकारने आपल्या प्राधमिकता काय आहे यावर विचार करून त्या अनुषंगाने कार्य केले पाहिजे. पर्यावरणाचे जतन करून राज्याचा विकास झाला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत पर्यावरणाची हानी होता कामा नये. आज गोव्यात नारळाचे दर दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून गोव्याची गरज लक्षात घेऊन नारळाचे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. तसेच नारळाच्या निर्यातीवरही बंधन घालणे तितकेच महत्त्वाचे आहे, असे केले तर स्थानिक लोकांना नारळ मुबलक प्रमाणात उपलब्ध होईल. गोव्यातील पहिले 'बटर फ्लाय' गार्डन पेन्ह द फ्रान्का पंचायतीने गोवा राज्य विविधताय मंडळाच्या सहकार्याने तयार केले आहे. गोव्यातील पंचायती व गोवा राज्य विविधताय मंडळाने एकत्र येऊन संघटितपणे काम केले तर गोव्यातील पुष्कळ समस्यांवर मात करणे सहज शक्य होईल, असे मंत्री खंवटे यांनी सांगितले.

सुभाष चंद्र यांनी सांगितले की, जनतेने जैविक संपदाचे जतन केली तर हवामान स्थिर राहील आणि त्याचा फायदा मानव जातीला होईल. म्हणून जैविक संपदाचे रक्षण करण्यासाठी जनतेने वन खात्याला सहकार्य करावे, असे आवाहन सुभाष चंद्र यांनी केले.

यावेळी डॉ. नंदकुमार कामत व आर्किटेक्ट कमलाकर साधले यांनी जैवविविधता क्षेत्रात उत्तम कामगिरी केल्याबद्दल त्यांचा २५ हजार रोख, शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन तर दक्षिण गोव्यातल्या कुडतरी पंचायत जैवविविधा व्यवस्थापन समिती व उत्तर गोव्यातल्या सुर्ला पंचायत जैवविविधताय व्यपस्थापन समितीचा ५० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व मानपत्र देऊन मंत्री रोहन खंवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सुरवातीला मंत्री रोहन खंवटे यांनी दीपप्रज्वलन केले. डॉ. प्रदीप सरमोकादम यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमात मंत्री खंवटे यांनी फळे व फळापासून तयार केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन केले तर सुभाष चंद्र यांनी जैव विविधताय विषयावरील माहिती पटाचे विमोचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष जाण व सिद्धी उपाध्ये यांनी केले तर राजेंद्र केरकर यांनी आभार मानले.

# घन कचरा व्यवस्थापनासाठी हवे सहकार्य

## मंत्री खंवटे; फोमेंतो मीडियाचा आंतरराष्ट्रीय जैव विविधता दिन उत्साहात

प्रतिनिधी । गोवन वार्ता

**पर्वरी** : राज्यासमोर आज घन कचरा व्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे आहे. ही समस्या सोडवण्यासाठी सरकारकडून सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. याला जनतेचेही सहकार्य मिळणे-आवश्यक आहे, असे प्रतिपादन महसूल मंत्री रोहन खंवटे यांनी केले.

साल्वादोर-द-मुंद पंचायत सभागृहात शनिवारी झालेल्या 'आंतरराष्ट्रीय जैव विविधता दिन' कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने मंत्री खंवटे बोलत होते. फोमेंतो मीडियातर्फे आयोजित केलेल्या या कार्यक्रमास गोवा सरकार, जागतिक पर्यावरण दिन, यूएन पर्यावरण, बीम्स, सोसायटी फॉर इंटिग्रेटेड कोस्टल मॅनेजमेंट, पणजी महापालिका, गोवा पर्यटन खाते यांचे सहकार्य लाभले. 'आपली जैवविविधता, आपले अन्न व आपले आरोग्य' या ब्रीदाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी मंत्री खंवटे यांच्यासोबत वन खात्याचे सचिव गोविंद जैसवाल (आयएएस), गोव्याचे मुख्य वनपाल सुभाष चंद्र, राज्य जैव विविधता मंडळाचे सदस्य डॉ. प्रदीप सरमोकादम, पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

> गोव्यात नारळाचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत. ही गरज लक्षात घेऊन नारळाचे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. तसेच नारळाच्या निर्यातीवर बंधन घालणे गरजेचे आहे.
> **— रोहन खंवटे**, महसूल मंत्री

> जैवसंपदेचे जतन केले तर हवामान स्थिर राहील. पर्यावरणाचा समतोल राहील. त्यासाठी वन खात्याला सहकार्य करावे.
> **—सुभाष चंद्र**, मुख्य वनपाल



जैव संपदेच्या रक्षणासाठी झटणाऱ्या सत्कारमूर्तीसमवेत महसूलमंत्री रोहन खंवटे व मान्यवर. (सर्व छाया : नारायण पिसुर्लेकर)

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. डॉ. सरमोकादम यांनी स्वागत केले. त्यानंतर मंत्री खंवटे यांच्या हस्ते फळे आणि फळांपासून तयार केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य वनपाल सुभाष चंद्र यांनी जैव विविधता विषयावरील माहितीपटाचे प्रदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष जाण व सिद्धी उपाध्ये यांनी केले. राजेंद्र केरकर यांनी आभार मानले.

### जैव विविधता जपणाऱ्या मान्यवरांचा सत्कार

या कार्यक्रमात डॉ. नंदकुमार कामत व वास्तुविशारद कमलाकर साधले त्यांचा २५ हजार रोख, शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तर दक्षिणेतील कुडतरी पंचायत जैव विविधता व्यवस्थापन समिती व उत्तरेतील सुर्ला पंचायत जैव विविधता व्यवस्थापन समिती यांचा ५० हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह व मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

To view profile of Dr. Nandkumar Kamat click here